# बोर्ड प्रश्नपत्रिका: मार्च 2025

## इतिहास व राज्यशास्त्र

**वेळ: 2 तास** **एकूण गुण: 40**

**सूचना: -** (i) सर्व कृती/प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
(ii) उजवीकडील अंक प्रश्नांचे/कृतींचे पूर्ण गुण दर्शवितात.
(iii) प्रश्न क्रमांक 1 ते 5 प्रश्न/कृती इतिहास व प्रश्न क्रमांक 6 ते 9 प्रश्न/कृती राज्यशास्त्र या विषयांवरील आहेत.
(iv) प्रश्न क्रमांक 1 (अ) आणि 6 मध्ये संपूर्ण विधाने लिहिणे आवश्यक आहे.
(v) प्रश्न क्रमांक 2 (अ) आणि 8 (ब) मधील संकल्पना चित्रे/कृती त्याच नमुना आराखड्यात पेनाने/पेन्सिलीने उत्तरपत्रिकेत तयार करणे अपेक्षित आहे.
(vi) प्रश्न 1 ला (अ), (ब) व प्रश्न 6 वा या प्रश्नांची उत्तरे उत्तरपत्रिकेत एकापेक्षा जास्त वेळा लिहिलेले असेल तर प्रथम लिहिलेले उत्तर हे गुणांसाठी गृहीत धरले जाईल.

**प्र.1. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा:** **[3]**

(1) जगातील सर्वात प्राचीन संग्रहालय ____________ या शहराचे उत्खनन करताना सापडले.
(अ) दिल्ली (ब) हडप्पा
(क) उर (ड) कोलकाता

(2) महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री ____________ हे होते.
(अ) वसंतराव नाईक (ब) यशवंतराव चव्हाण
(क) शंकरराव चव्हाण (ड) वसंतदादा पाटील

(3) हितोपदेश या संस्कृत ग्रंथाचा जर्मन भाषेत अनुवाद ____________ यांनी केला.
(अ) जेम्स मिल (ब) फ्रेडरिक मॅक्सम्युलर
(क) माऊंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन (ड) जॉन मार्शल

**(ब) पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखून पुन्हा लिहा:** **[3]**

**(1)** (i) रायगडाला जेव्हा जाग येते – वसंत कानेटकर
(ii) टिळक आणि आगरकर – विश्राम बेडेकर
(iii) साष्टांग नमस्कार – आचार्य अत्रे
(iv) एकच प्याला – अण्णासाहेब किर्लोस्कर


**(2)** (i) लिओपॉल्ड व्हॉन रांके – द सिक्रेट ऑफ वर्ल्ड हिस्टरी
(ii) मायकेल फुको – आर्केऑलॉजी ऑफ नॉलेज
(iii) कार्ल मार्क्स – दास कॅपिटल
(iv) रेने देकार्त – रिझन इन हिस्टरी

**(3)** (i) प्रभाकर – आचार्य प्र. के. अत्रे
(ii) दर्पण – बाळशास्त्री जांभेकर
(iii) दीनबंधू – कृष्णराव भालेकर
(iv) केसरी – बाळ गंगाधर टिळक


Target Publications

**प्र.2. (अ) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा (कोणतेही दोन):** **[4]**


(1) पुढील तक्ता पूर्ण करा:




(2) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा:




(3) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा:




**(ब) थोडक्यात टिपा लिहा (कोणतेही दोन):** **[4]**

(1) उपयोजित इतिहास

(2) मराठा चित्रशैली

(3) स्थळ कोश.

**प्र.3. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा (कोणतेही दोन):** **[4]**

(1) फुको यांच्या लेखनपद्धतीला 'ज्ञानाचे पुरातत्त्व' असे म्हटले आहे.

(2) बखर हा ऐतिहासिक साहित्यातील महत्त्वाचा प्रकार आहे.

(3) चित्रपट माध्यमात इतिहास हा विषय महत्त्वाचा आहे.

(4) तंत्रज्ञानाचा इतिहास अभ्यासावा लागतो.

Target Publications

**प्र.4. दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा:** **[4]**

मेजर ध्यानचंद हे भारतीय हॉकीचे खेळाडू आणि संघनायक होते. त्यांच्या नेतृत्वाखाली 1936 साली भारतीय हॉकी संघाने बर्लिन ऑलिंपिकमध्ये सुवर्णपदक जिंकले. त्यापूर्वी 1928 आणि 1932 मध्येही भारतीय हॉकी संघाने सुवर्णपदके जिंकली होती. तेव्हा ध्यानचंद हे भारतीय संघाकडून खेळले होते. 29 ऑगस्ट हा त्यांचा जन्मदिवस 'राष्ट्रीय क्रीडादिवस' म्हणून पाळला जातो. त्यांना 'हॉकीचे जादूगार' असे म्हणतात. 1956 मध्ये त्यांच्या हॉकीतील कामगिरीबद्दल त्यांना 'पद्मभूषण' या सन्मानाने विभूषित करण्यात आले.

**प्रश्न :**

(1) 1936 मध्ये भारतीय हॉकी संघाचे संघनायक कोण होते? (1)

(2) भारतात कोणता दिवस राष्ट्रीय क्रीडादिवस म्हणून साजरा केला जातो? (1)

(3) हॉकी खेळाविषयी आपले मत मांडा. (2)

**प्र.5. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही दोन):** **[6]**

(1) स्त्रीवादी इतिहासलेखन म्हणजे काय?

(2) कला क्षेत्रात व्यवसायाच्या कोणत्या संधी उपलब्ध आहेत? हे स्पष्ट करा.

(3) पोवाडा म्हणजे काय? हे स्पष्ट करा.

(4) पर्यटनाचे कोणतेही तीन प्रकार स्पष्ट करा.

**प्र.6. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा:** **[2]**

(1) महाराष्ट्रात स्थानिक शासनसंस्थांमध्ये महिलांसाठी ____________ जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत.

(अ) 25% (ब) 30%

(क) 40% (ड) 50%

(2) शेतीचे उत्पादन वाढवण्यासाठी आणि अन्नधान्याबाबत स्वयंपूर्ण होण्यासाठी ____________ करण्यात आली.

(अ) जलक्रांती (ब) हरितक्रांती

(क) औद्योगिक क्रांती (ड) धवलक्रांती

**प्र.7. पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा (कोणतीही दोन):** **[4]**

(1) विशिष्ट प्रसंगी निवडणूक आयोग एखाद्या मतदार संघात पुन्हा निवडणुका घेतात.

(2) माहितीच्या अधिकारामुळे शासनाच्या कारभारातील गोपनीयता वाढली आहे.

(3) आघाडी शासनातून अस्थिरता निर्माण होते.


**प्र.8. (अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा (कोणतीही एक):** **[2]**

(1) अल्पसंख्याकविषयक तरतुदी

(2) कामगार चळवळ.

**(ब) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा (कोणतीही एक):** **[2]**

(1) पुढील तक्ता पूर्ण करा:





(1) .................. (1) ..................

(2) .................. (2) ..................

Target Publications

(2) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा:




**प्र.9. पुढील प्रश्नाचे थोडक्यात उत्तर लिहा (कोणतेही एक):** **[2]**

(1) राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळवण्यासाठी निवडणूक आयोगाने स्पष्ट केलेले निकष सांगा.

(2) भारतात लोकशाहीच्या यशासाठी कोणत्या बाबी आवश्यक आहेत?

Target Publications

# बोर्ड प्रश्नपत्रिका: मार्च 2023

## इतिहास व राज्यशास्त्र

**वेळ: 2 तास** **एकूण गुण: 40**

**सूचना: -**
(i) सर्व कृती/प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.
(ii) उजवीकडील अंक प्रश्नांचे/कृतींचे पूर्ण गुण दर्शवितात.
(iii) प्रश्न क्रमांक 1 ते 5 प्रश्न/कृती इतिहास व प्रश्न क्रमांक 6 ते 9 प्रश्न/कृती राज्यशास्त्र या विषयांवरील आहेत.
(iv) प्रश्न क्रमांक 1(अ) आणि 6 मध्ये संपूर्ण विधान लिहिणे आवश्यक आहे.
(v) प्रश्न क्रमांक 2 (अ) आणि 8 (ब) मधील संकल्पनाचित्रे/कृती त्याच नमुना आराखड्यात पेनाने उत्तरपत्रिकेत तयार करणे अपेक्षित आहे.
(vi) प्रश्न 1 ला (अ), (ब) व प्रश्न 6 वा या प्रश्नांची उत्तरे उत्तरपत्रिकेत एकापेक्षा जास्त वेळा लिहिलेली असतील, तर प्रथम लिहिलेले उत्तर हे गुणांसाठी गृहीत धरले जाईल.

**प्र.1. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.** **[3]**

(1) लिओनार्दो द विंची या जगप्रसिद्ध इटालियन चित्रकाराने रेखाटलेल्या ____________ या चित्राचा समावेश लुव्र संग्रहालयात आहे.
(अ) नेपोलियन (ब) मोनालिसा
(क) हॅन्स स्लोअन (ड) दुसरा जॉर्ज

(2) थॉमस कुकने ____________ विकण्याचा एजन्सी व्यवसाय सुरू केला.
(अ) हस्तकौशल्याच्या वस्तू (ब) खेळणी
(क) खाद्यवस्तू (ड) पर्यटन तिकिटे

(3) एकोणिसाव्या शतकात स्त्रियांविषयी लेखन करणाऱ्या लेखिकांमध्ये __________ यांचे नाव अग्रणी आहे.
(अ) ताराबाई शिंदे
(ब) पंडिता रमाबाई
(क) मीरा कोसंबी
(ड) शर्मिला रेगे

**(ब) पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखून पुन्हा लिहा.** **[3]**

**(1)**

| | **शहरे** | | **ग्रंथालय** |
|---|---|---|---|
| (i) | कोलकाता | – | नॅशनल लायब्ररी |
| (ii) | दिल्ली | – | नेहरू मेमोरिअल म्युझियम अँड लायब्ररी |
| (iii) | हैदराबाद | – | स्टेट सेंट्रल लायब्ररी |
| (iv) | पुणे | – | लायब्ररी ऑफ एशियाटिक सोसायटी |

**(2)**


| | **विचारवंत** | | **देश** |
|---|---|---|---|
| (i) | कार्ल मार्क्स | – | इंग्लंड |
| (ii) | मायकेल फुको | – | फ्रान्स |
| (iii) | लिओपॉल्ड व्हॉन रांके | – | जर्मनी |
| (iv) | हिरोडोटस | – | ग्रीस |

Target Publications


| (3) | नियतकालिके | | कालावधी |
|---|---|---|---|
| (i) | साप्ताहिक | – | सात दिवस |
| (ii) | पाक्षिक | – | पंधरा दिवस |
| (iii) | मासिक | – | एक महिना |
| (iv) | त्रैमासिक | – | दोन महिने |

**प्र.2. (अ) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा (कोणतेही दोन).** **[4]**


(1) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.




(2) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.




(3) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.




**(ब) थोडक्यात टिपा लिहा (कोणत्याही दोन).** **[4]**

(1) द्वंद्ववाद (2) जनांसाठी इतिहास (3) मराठी रंगभूमी.

**प्र.3. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा (कोणतीही दोन).** **[4]**

(1) सर्व प्रसारमाध्यमांत दूरदर्शन अतिशय लोकप्रिय माध्यम आहे.

(2) महाराष्ट्रात संत एकनाथांची भारुडे लोकप्रिय झाली.

(3) आयुर्वेदिक उपचारासाठी परदेशी पर्यटक भारतात येतात.

(4) मेजर ध्यानचंद यांना हॉकीचे जादूगार म्हणतात.

**प्र.4. दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा.** **[4]**

खेळ आणि ग्रीक लोक यांचे नाते प्राचीन काळापासूनचे आहे. खेळांना नियमित व सुसंघटित स्वरूप ग्रिकांनी दिले. धावणे, थाळीफेक, रथ व घोड्यांच्या शर्यती, कुस्ती, मुष्टियुद्ध इत्यादींचे सामने त्यांनी सुरू केले. प्राचीन ऑलिंपिक ही खेळाची स्पर्धा ऑलिंपिया या ग्रीक शहरात घेतली जात असे. या स्पर्धेत भाग घेणे व विजय मिळवणे मानाचे समजले जाते.

Target Publications

(1) प्राचीन ऑलिंपिक खेळाची स्पर्धा कोणत्या शहरात घेतली जात असे? (1)

(2) खेळ आणि ग्रीक लोक यांचे नाते कोणत्या काळापासूनचे आहे? (1)

(3) ऑलिंपिक स्पर्धाविषयी आपले मत मांडा. (2)

**प्र.5. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतीही दोन).** **[6]**

(1) बखर म्हणजे काय ते सांगून बखरीच्या प्रकारांविषयी सविस्तर माहिती लिहा.

(2) इतिहासाच्या साधनांचे जतन व्हावे यासाठी किमान **सहा** उपाय सुचवा.

(3) पर्यटनाशी संबंधित व्यावसायिक क्षेत्रे स्पष्ट करा.

(4) अभिलेखागाराच्या व्यवस्थापनात कोणती कामे महत्त्वाची आहेत?

**प्र.6. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.** **[2]**

(1) पुढील कोणत्या कायद्याद्वारे महिलांना त्यांचे स्वातंत्र्य जपण्यास आणि स्वत:चा विकास साधण्यास अनुकूल वातावरण निर्माण केले आहे?

(अ) माहितीचा अधिकार कायदा (ब) हुंडाप्रतिबंधक कायदा

(क) अन्नसुरक्षा कायदा (ड) शिक्षण हक्क कायदा

(2) 1986 साली _____________ अस्तित्वात आला.

(अ) ग्राहक संरक्षण कायदा (ब) कामगार कायदा

(क) माहितीचा अधिकार कायदा (ड) हुंडाविरोधी कायदा

**प्र.7. पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा (कोणतीही दोन).** **[4]**

(1) संविधानाचे स्वरूप एखाद्या जिवंत दस्तऐवजाप्रमाणे असते.

(2) विशिष्ट प्रसंगी निवडणूक आयोग एखाद्या मतदारसंघात पुन्हा निवडणूक घेतात?


(3) चळवळीला खंबीर नेतृत्वाची गरज नसते.

**प्र.8. (अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा (कोणतीही एक).** **[2]**


(1) राष्ट्रीय पक्ष (2) भ्रष्टाचार

**(ब) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा (कोणतीही एक).** **[2]**

(1) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.




(2) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.




**प्र.9. पुढील प्रश्नाचे थोडक्यात उत्तर लिहा (कोणतेही एक).** **[2]**

(1) सामाजिक न्याय प्रस्थापित करणे म्हणजे काय?

(2) मुक्त व न्याय्य निवडणुका घेण्यासमोरील आव्हाने कोणती आहेत?

Target Publications

# बोर्ड प्रश्नपत्रिका: मार्च 2022

## इतिहास व राज्यशास्त्र

**वेळ: 2 तास** **एकूण गुण: 40**

**सूचना: -** (i) सर्व कृती/प्रश्न सोडवणे आवश्यक आहेत.

(ii) उजवीकडील अंक प्रश्नांचे/कृतींचे पूर्ण गुण दर्शवतात.

(iii) प्रश्न क्रमांक 1 ते 5 प्रश्न/कृती इतिहास व प्रश्न क्रमांक 6 ते 9 प्रश्न/कृती राज्यशास्त्र या विषयांवरील आहेत.

(iv) प्रश्न क्रमांक 1(अ) आणि 6 मध्ये संपूर्ण विधान लिहिणे आवश्यक आहे.

(v) प्रश्न क्रमांक 2 (अ) आणि 8 (ब) मधील संकल्पनाचित्रे/कृती त्याच नमुना आराखड्यात पेनाने उत्तरपत्रिकेत तयार करणे अपेक्षित आहे.

(vi) प्रश्न 1 ला (अ), (ब) व प्रश्न 6 वा या प्रश्नांची उत्तरे उत्तरपत्रिकेत एकापेक्षा जास्त वेळा लिहिलेले असेल, तर प्रथम लिहिलेले उत्तर हे गुणांसाठी गृहीत धरले जाईल.

**प्र.1. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.** **[3]**

(1) भारतातील पहिले इंग्रजी वर्तमानपत्र ____________ यांनी सुरू केले.

(अ) जेम्स ऑगस्टस हिकी (ब) सर जॉन मार्शल

(क) ॲलन ह्यूम (ड) मायकेल फुको

(2) भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण खात्याचे पहिले सरसंचालक ____________ हे होते.

(अ) अलेक्झांडर कनिंगहॅम (ब) विल्यम जोन्स

(क) जॉन मार्शल (ड) फ्रेडरिक मॅक्सम्युलर

(3) कोलकाता येथील ____________ हे भारतातील पहिले संग्रहालय होय.

(अ) गव्हर्न्मेंट म्युझियम

(ब) राष्ट्रीय वस्तुसंग्रहालय

(क) छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय

(ड) भारतीय संग्रहालय

**(ब) पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखून पुन्हा लिहा.** **[3]**

(1) (i) बेंजामिन ट्युडेला – स्पेन

(ii) मार्को पोलो – इटली

(iii) इब्न बतूता – भारत

(iv) युआन श्वांग – चीन

(2) (i) मल्लखांब – शारीरिक कसरतीचा खेळ

(ii) कबड्डी – मैदानी खेळ

(iii) आईस हॉकी – साहसी खेळ

(iv) आट्यापाट्या – बैठे खेळ

(3) (i) जेम्स ऑगस्टस हिकी – बेंगॉल गॅझेट

(ii) बाळशास्त्री जांभेकर – दर्पण


(iii) भाऊ महाजन – ज्ञानोदय

(iv) लोकमान्य बाळ गंगाधर टिळक – केसरी


Target Publications

**प्र.2. (अ) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा (कोणतेही दोन).** **[4]**


(1) इतिहास विषयाशी संबंधित कोशांच्या संदर्भातील पुढील कालरेषा पूर्ण करा.




(2) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.




(3) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.




**(ब) थोडक्यात टिपा लिहा (कोणत्याही दोन).** **[4]**

(1) वंचितांचा इतिहास (2) व्हॉल्टेअर (3) लुव्र संग्रहालय

**प्र.3. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा (कोणतीही दोन).** **[4]**

(1) आपण आपला नैसर्गिक आणि सांस्कृतिक वारसा जपला पाहिजे.

(2) वर्तमानपत्रांना इतिहास या विषयाची गरज पडते.

(3) खेळण्यांद्वारे इतिहासावर प्रकाश पडतो.

(4) बाळ ज. पंडित यांचे आकाशवाणीवरील क्रिकेटचे धावते समालोचन रंजक होत असे.

**प्र.4. दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा.** **[4]**

**सोहगौडा ताम्रपट:** हा ताम्रपट सोहगौडा (जिल्हा गोरखपूर, उत्तर प्रदेश) येथे सापडला. हा ताम्रपट मौर्य काळातील असावा असे मानले जाते. ताम्रपटावरील कोरीव लेख ब्राह्मी लिपीत आहे. लेखाच्या सुरुवातीस जी चिन्हे आहेत त्यातील पारासहित असलेला वृक्ष, तसेच पर्वत (एकावर एक असलेल्या तीन कमानी) ही चिन्हे प्राचीन आहत नाण्यांवरही आढळतात. चार खांबांवर उभे असलेले दुमजली इमारतीप्रमाणे दिसणारे चिन्ह कोठारघरांचे निदर्शक असावेत, असे अभ्यासकांचे मत आहे. या कोठारघरांमधील धान्य जपून वापरण्यात यावे, असा आदेश त्या लेखात दिलेला आहे. दुष्काळजन्य परिस्थितीचे निवारण करण्यासाठी काय काळजी घ्यावी, या संदर्भातील हा आदेश असावा, असे मानले जाते.

(1) सोहगौडा ताम्रपट कोठे सापडला? (1)

(2) सोहगौडा ताम्रपटावरील कोरीव लेख कोणत्या लिपीमध्ये लिहिलेला आहे? (1)

(3) सोहगौडा ताम्रपटाचे इतिहासाचे साधन म्हणून महत्त्व स्पष्ट करा. (2)

**प्र.5. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतीही दोन).** **[6]**

(1) उपयोजित इतिहासाचा वर्तमानकाळाशी कसा सहसंबंध असतो?

(2) आकाशवाणीचा इतिहास लिहा.

Target Publications

(3) मैदानी खेळ व बैठे खेळ यांच्यातील फरक स्पष्ट करा.

(4) पर्यटन आणि आतिथ्यक्षेत्रात इतिहासाच्या विद्यार्थ्यांना कोणत्या व्यावसायिक संधी उपलब्ध आहेत?

**प्र.6. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.** **[2]**

(1) लोकशाहीचा गाभा म्हणजे ____________

(अ) प्रौढ मताधिकार (ब) सत्तेचे विकेंद्रीकरण

(क) राखीव जागांचे धोरण (ड) न्यायालयीन निर्णय

(2) स्वातंत्र्यपूर्वकाळात ओडिशातील ____________ या आदिवासी जमातीने ब्रिटिशांविरोधात उठाव केला.

(अ) कोळी (ब) गोंड (क) भिल्ल (ड) रामोशी

**प्र.7. पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा (कोणतीही दोन).** **[4]**

(1) न्यायालयाच्या विविध विषयांवरील निर्णयातून भारतातील राजकीय प्रक्रिया परिपक्व होण्यास मदत झाली आहे.

(2) एखाद्या घटकराज्यात केव्हा व किती टप्प्यात निवडणुका घ्यायच्या हे राज्यसरकार ठरवते.

(3) ग्राहक चळवळ अस्तित्वात आली.

**प्र.8. (अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा (कोणतीही एक).** **[2]**


(1) बहुपक्ष पद्धती

(2) जलक्रांती


**(ब) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा (कोणतीही एक).** **[2]**

(1) पुढील ओघतक्ता पूर्ण करा.

निवडणूक प्रक्रिया:




(2) दिलेला आकृतिबंध पूर्ण करा.




**प्र.9. पुढील प्रश्नाचे थोडक्यात उत्तर लिहा (कोणतेही एक).** **[2]**

(1) न्यायालयाने दिलेल्या कोणकोणत्या निर्णयांमुळे महिलांच्या सन्मान व प्रतिष्ठेची जपणूक झालेली आहे?

(2) चळवळीला खंबीर नेतृत्वाची गरज का असते?

Target Publications

# बोर्ड कृतिपत्रिका: जुलै 2022

## इतिहास व राज्यशास्त्र

**वेळ: 2 तास** **एकूण गुण: 40**

**सूचना:**
(1) सर्व कृती/प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.
(2) उजवीकडील अंक प्रश्नांचे/कृतींचे गुण दर्शवतात.
(3) प्रश्न/कृती 1 ते 5 इतिहास; तर प्रश्न/कृती 6 ते 9 राज्यशास्त्रावर विचारलेल्या आहेत.
(4) प्रश्न क्रमांक 1. (अ) व प्रश्न क्रमांक 6 मध्ये संपूर्ण विधान लिहिणे आवश्यक आहे.
(5) प्रश्न क्रमांक 2. (अ) आणि 8. (ब) मध्ये दिलेली संकल्पनाचित्रे कृतिपत्रिकेनुसारच पेनाने उत्तरपत्रिकेत तयार करणे अपेक्षित आहे.
(6) प्रश्न क्रमांक 1. (ब) मधील प्रत्येक संचातील फक्त चुकीची जोडी ओळखून लिहिणे अपेक्षित आहे.
(7) प्रश्न क्रमांक 1. (अ), 1. (ब) व 6 या प्रश्नांची उत्तरे एकापेक्षा अधिक वेळा लिहिलेली असल्यास, प्रथम लिहिलेली उत्तरेच गुणांसाठी गृहीत धरली जातील.

**प्र.1. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पुढील विधाने पूर्ण करा:** **[3]**

(1) हितोपदेश या संस्कृत ग्रंथाचा जर्मन भाषेत अनुवाद ____________ यांनी केला.
(अ) जेम्स मिल (ब) फ्रेडरिक मॅक्सम्युलर
(क) माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन (ड) जॉन मार्शल

(2) जगातील सर्वांत प्राचीन संग्रहालय ____________ या शहराचे उत्खनन करताना सापडले.
(अ) दिल्ली (ब) हडप्पा
(क) उर (ड) कोलकाता

(3) महाबळेश्वर जवळील भिलार हे ____________ गांव म्हणून प्रसिध्द आहे.
(अ) पुस्तकांचे (ब) वनस्पतींचे
(क) आंब्याचे (ड) किल्ल्यांचे

**(ब) पुढील प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखून लिहा:** **[3]**


(1) (i) जॉर्ज विल्हेम फ्रेडरिक हेगेल – रिझन इन हिस्टरी
(ii) लिओपॉल्ड व्हॉन रांके – द थिअरी अँड प्रॅक्टीस ऑफ हिस्टरी
(iii) हिरोडोटस – द हिस्टरीज
(iv) कार्ल मार्क्स – डिसकोर्स ऑन द मेथड

(2) (i) दर्पण – बाळशास्त्री जांभेकर
(ii) प्रभाकर – आचार्य प्र. के. अत्रे
(iii) दीनबंधू – कृष्णराव भालेकर
(iv) केसरी – बाळ गंगाधर टिळक

(3) (i) निघोज येथील रांजणखळगे – भौगोलिक पर्यटन
(ii) राजस्थानातील किल्ले – ऐतिहासिक पर्यटन
(iii) कृषी विद्यापीठाला भेट – कृषी पर्यटन
(iv) हिमालयीन कार रॅली – आरोग्य पर्यटन

**प्र.2. (अ) दिलेल्या सूचनांप्रमाणे कृती करा: (कोणत्याही दोन)** **[4]**


**(1) पुढील आकृतिबंध पूर्ण करा :**




**(2) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा:**




**(3) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा:**




**(ब) थोडक्यात टिपा लिहा: (कोणत्याही दोन)** **[4]**

(1) व्हॉल्टेअर

(2) केसरी व मराठा

(3) खेळणी आणि उत्सव

**प्र.3. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा: (कोणतीही दोन)** **[4]**

(1) स्त्रियांच्या आयुष्याशी निगडित विविध पैलूंवर विचार करणारे संशोधन सुरू झाले.

(2) तंत्रज्ञानाचा इतिहास अभ्यासावा लागतो.

(3) खेळण्यांद्वारे इतिहासावर प्रकाश पडतो.

(4) विविध विषयांमधील कृतींसाठी प्रशिक्षणाची आवश्यकता असते.

Target Publications

**प्र.4. दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून, त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा:** **[4]**

> **वारसा मुशाफिरी (हेरिटेज वॉक) :** ऐतिहासिक वारसास्थळाला भेट देण्यासाठी जाणे याला 'हेरिटेज वॉक' असे म्हणतात. येथे इतिहास घडला तेथे प्रत्यक्ष जाऊन इतिहास जाणून घेणे ही अनुभूती हेरिटेज वॉकमध्ये येते. जगभर अशा प्रकारचे उपक्रम चालवले जातात. भारताला शेकडो वर्षांचा इतिहास आहे. भारतातील प्रत्येक राज्यात ऐतिहासिक स्थळे आहेत. यात प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक स्थळे यांचा समावेश होतो. गुजरातमधील अहमदाबाद शहरातील हेरिटेज वॉक प्रसिद्ध आहे. महाराष्ट्रात मुंबई-पुणे इत्यादी शहरांमध्ये या उपक्रमांचे आयोजन केले जाते. यामुळे ऐतिहासिक वस्तू जतन करणे, त्याची माहिती जमवणे आणि तो जगभर विविध माध्यमातून पोहोचवणे इत्यादी उपक्रम चालवले जातात. ऐतिहासिक व्यक्तींची निवासस्थाने ही सुध्दा ऐतिहासिक वारसा असतात. काही ठिकाणी अशा स्थळांवर नीलफलक लावण्याची पद्धत आहे.

**प्रश्न:**

(1) हेरिटेज वॉक म्हणजे काय? (1)

(2) भारतातील कोणकोणत्या शहरात हेरिटेज वॉकचे आयोजन केले जाते? (1)

(3) तुमच्या जिल्ह्यातील कोणत्या ठिकाणी तुम्हांला हेरिटेज वॉकला जायला आवडेल व का? (2)

**प्र.5. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा: (कोणतेही दोन)** **[6]**

(1) मार्क्सवादी इतिहासलेखन म्हणजे काय?

(2) ग्रंथालय व्यवस्थापन का महत्त्वाचे आहे?

(3) मैदानी खेळ व बैठे खेळ यांच्यातील फरक स्पष्ट करा.

(4) वृत्तपत्रे सुरू होण्याआधीच्या काळात बातम्या लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी जगभर कोणते मार्ग अवलंबले जात असत?

**प्र.6. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा:** **[2]**

(1) महाराष्ट्रात स्थानिक शासनसंस्थामध्ये महिलांसाठी ____________जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत.

(अ) २५% (ब) 30% (क) ४०% (ड) ५०%

(2) शेतीचे उत्पादन वाढवण्यासाठी आणि अन्नधान्याबाबत स्वयंपूर्ण होण्यासाठी ____________ करण्यात आली.

(अ) जलक्रांती (ब) हरितक्रांती

(क) औद्योगिकक्रांती (ड) धवलक्रांती

**प्र.7. पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा: (कोणतीही दोन)** **[4]**

(1) भारतीय लोकशाही जगातील सर्वांत मोठी लोकशाही मानली जाते.

(2) आघाडी शासनातून अस्थिरता निर्माण होते.

(3) चळवळीला खंबीर नेतृत्वाची गरज नसते.


**प्र.8. (अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा: (कोणतीही एक)** **[2]**

(1) माहितीचा अधिकार

(2) निवडणूक सुधारणा

**(ब) दिलेल्या सूचनांप्रमाणे कृती करा: (कोणतीही एक)** **[2]**

**(1) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा:**




Target Publications

**(2) पुढील तक्ता पूर्ण करा.**

| राज्य / परिसर | आदिवासी |
|---|---|
| (i) ओडिशा | --------------------------- |
| (ii) --------------------------- | कोळी |
| (iii) छोटा नागपूर | --------------------------- |
| (iv) --------------------------- | संथाळ |

**प्र.9. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा: (कोणताही एक)** **[2]**

(1) निवडणूक आयोगाची कार्ये स्पष्ट करा.

(2) भारतातील शेतकरी चळवळींचे स्वरूप स्पष्ट करा.

Target Publications

# बोर्ड प्रश्नपत्रिका: मार्च २०२०

## इतिहास व राज्यशास्त्र

**वेळ: २ तास** **एकूण गुण: ४०**

**सूचना:**
1. सर्व कृती/प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.
2. उजवीकडील अंक प्रश्नांचे/कृतींचे पूर्ण गुण दर्शवितात.
3. प्रश्न क्रमांक 1 ते 5 प्रश्न/कृती इतिहास व प्रश्न क्रमांक 6 ते 9 प्रश्न/कृती राज्यशास्त्र या विषयांवरील आहेत.
4. प्रश्न क्रमांक 1(अ) आणि 6 मध्ये संपूर्ण विधान लिहिणे आवश्यक आहे.
5. प्रश्न क्रमांक 2(अ) आणि 8(ब) मधील संकल्पनाचित्रे त्याच नमुना आराखड्यानुसार पेनाने उत्तरपत्रिकेत तयार करणे अपेक्षित आहे.
6. प्रश्न 1ला (अ), (ब) व प्रश्न 6वा या प्रश्नांची उत्तरे उत्तरपत्रिकेत एकापेक्षा जास्त वेळा लिहिलेले असेल तर प्रथम लिहिलेले उत्तरे हे गुणांसाठी गृहीत धरले जाईल.

**प्र.1. अ. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा:** **(3)**

1. आधुनिक इतिहासाचा जनक ________ यास म्हणता येईल.
   (अ) व्हॉल्टेअर (ब) रेने देकार्त
   (क) लिओपोल्ड रांके (ड) कार्ल मार्क्स

2. विज्ञान आणि इतर सर्वच ज्ञान शाखांची ________ ही जननी मानली जाते.
   (अ) तत्त्वज्ञान (ब) नीतिशास्त्र (क) इतिहास (ड) मानववंशशास्त्र

3. महाबळेश्वरजवळील भिलार हे ________ गाव म्हणून प्रसिद्ध आहे.
   (अ) वनस्पतींचे (ब) आंब्याचे (क) पुस्तकांचे (ड) किल्ल्यांचे

**आ. पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखून लिहा:** **(3)**

1.

| | | |
|---|---|---|
| i. | वि. का राजवाडे | मराठ्यांच्या इतिहासाची साधने |
| ii. | स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर | द इंडियन वॉर ऑफ इन्डिपेन्डन्स 1857 (1857 चे स्वतंत्र्य समर) |
| iii. | पंडीता रमाबाई | स्त्री-पुरुष तुलना |
| iv. | महात्मा फुले | गुलामगिरी |

2.

| | | |
|---|---|---|
| i. | दर्पण | बाळशास्त्री जांभेकर |
| ii. | केसरी | बाळ गंगाधर टिळक |
| iii. | दीनबंधु | गोपाळ हरी देशमुख |
| iv. | प्रभाकर | भाऊ महाजन |


3.

| | | |
|---|---|---|
| i. | लेणी | माथेरान, चिखदरा |
| ii. | रेल्वे स्टेशन | छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई |
| iii. | अभयारण्य | दाजीपूर |
| iv. | नैसर्गिक वारसा | पश्चिम घाट व तेथील कास पठार |


Target Publications

**प्र.२. अ. दिलेली संकल्पनाचित्रे पूर्ण करा (कोणतेही दोन): (4)**


1. पुढील आकृतिबंध पूर्ण करा:




2. पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा:




3.




**(ब) थोडक्यात टिपा लिहा (कोणत्याही दोन): (4)**

1. स्त्रीवादी इतिहास
2. मनोरंजनाची आवश्यकता
3. खेळांचे महत्त्व

**प्र.3. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा (कोणतेही दोन): (4)**

1. व्हॉल्टेअर हा आधुनिक इतिहासलेखनाचा जनक होता असे म्हटले जाते.
2. जागतिक वारश्याच्या पदास पात्र ठरणारी स्थळे, परंपरा यांची यादी युनेस्कोद्वारे जाहीर केली जाते.
3. कलेच्या इतिहासाचा सखोल अभ्यास असणाऱ्या तज्ज्ञांची आवश्यकता असते.
4. अभिलेखागारे व ग्रंथालये नियतकालिके आणि इतर प्रकाशने प्रसिद्ध असतात.

**प्र 4. दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (4)**

**दशावतारी नाटके:** दशावतारी नाटके हा महाराष्ट्रातील लोकनाट्याचा एक प्रकार आहे. सुगीनंतर कोकण आणि गोवा येथे दशावतारी नाटकांचे प्रयोग होतात. दशावतारी नाटके मत्स्य, कूर्म, वराह, नरसिंह, वामन, परशुराम, राम, कृष्ण, बुद्ध व कल्की या दहा अवतारांवर आधारित असतात. सर्वप्रथम सूत्रधार विघ्नहर्ता गणपतीला आवाहन करतो.

दशावतारी नाटकातील पात्रांचा अभिनय, रंगभूषा, वेशभूषा, परंपरागत असते. नाटकातील बहुतेक भाग पद्यमय असतो. काही संवाद पात्रे स्वयंस्फूर्तीने बोलतात. देवांसाठी लाकडी मुखवटे वापरतात. नाटकाचा शेवट हंडी फोडून दहीकाला वाटणे व आरती करणे या कृतीने होतो.

Target Publications

18व्या शतकात श्यामजी नाईक काळे यांनी दशावतारी खेळ दाखवणारा एक फड स्थापन केला होता. तो फड घेऊन ते महाराष्ट्रभर फिरत असत. विष्णुदास भावे यांनी दशावतारी नाट्यतंत्राचे संस्करण करून आपली पौराणिक नाटके सादर केली. यामुळे मराठी नाटकाची पूर्वपीठिका दशावतारी नाटकांपर्यत जाते.

1. दशावतारी नाटके हा कोणत्या राज्यातील लोकनाट्याचा प्रकार आहे? 1
2. दशावतारी नाटकाच्या सुरूवातीला सूत्रधार कोणाला आवाहन करतो? 1
3. दशावतारी नाटकाच्या सादरीकरणाचे स्वरूप स्पष्ट करा. 2

**प्र.5. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही दोन): (6)**

1. मार्क्सवादी इतिहासलेखन म्हणजे काय?
2. लिखित साधनांचा अभ्यास करणाऱ्यांनी कोणते प्रशिक्षण घेण्याची आवश्यकता असते?
3. कला क्षेत्रात व्यवसायाच्या कोणत्या संधी उपलब्ध आहेत? हे स्पष्ट करा.
4. वृत्तपत्रे सुरू होण्याआधीच्या काळात बातम्या लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी जगभर कोणते मार्ग अवलंबले जात असत?

**प्र.६. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा. (2)**

1. लोकशाहीचा गाभा म्हणजे ________
   (अ) प्रौढ मताधिकार  (ब) सत्तेचे विकेंद्रीकरण
   (क) राखीव जागेचे धोरण  (ड) न्यायालयीन निर्णय

2. शेतकरी चळवळींची ________ ही प्रमुख मागणी आहे.
   (अ) वनजमिनीवर लागवड करण्याचा अधिकार मिळावा
   (ब) शेतमालाला योग्य भाव मिळावा
   (क) ग्राहकांचे संरक्षण करणे
   (ड) धरणे बांधावीत

**प्र.7. पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा (कोणतेही दोन): (4)**


1. भारतीय लोकशाही जगातील सर्वात मोठी लोकशाही मानली जाते.
2. राजकीय पक्ष शासन व जनता यांच्यातील दुवा म्हणून काम करतात.
3. डाव्या उग्रवादी चळवळीत आज शेतकरी व आदिवासी यांच्या समस्यांचे महत्त्व वाढत आहे.

**प्र.8. (अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा. (कोणतेही एक) (2)**

1. माहितीचा अधिकार
2. प्रादेशिकता


**(ब) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा (कोणतेही एक): (2)**

1. पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा:




Target Publications

2. पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा:




**प्र.9. पुढील प्रश्नाचे थोडक्यात उत्तर लिहा (कोणतेही एक):** **(2)**

1. निवडणूक आचारसंहिता म्हणजे काय? हे स्पष्ट करा.
2. स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्री चळवळी कोणत्या सुधारणांसाठी लढत होत्या?

Target Publications

# बोर्ड कृतिपत्रिका: डिसेंबर 2020

## इतिहास – राज्यशास्त्र

**वेळ: 2 तास** **एकूण गुण: 40**

**सूचना:**
(1) सर्व प्रश्न/कृती सोडवणे आवश्यक आहे.
(2) उजवीकडील अंक प्रश्नांचे/कृतींचे गुण दर्शवतात.
(3) प्रश्न/कृती 1 ते 5 इतिहासावर; तर प्रश्न/कृती 6 ते 9 राज्यशास्त्रावर विचारलेल्या आहेत.
(4) प्रश्न क्रमांक 1. (अ) व प्रश्न क्रमांक 6. मध्ये संपूर्ण विधाने लिहिणे आवश्यक आहे.
(5) प्रश्न क्रमांक 2. (अ) आणि 8. (ब) मध्ये दिलेली संकल्पनाचित्रे कृतिपत्रिकेनुसारच पेनाने उत्तरपत्रिकेत तयार करणे अपेक्षित आहे.
(6) प्रश्न क्रमांक 1. (ब) मधील प्रत्येक संचातील फक्त चुकीची जोडी ओळखून लिहिणे अपेक्षित आहे.
(7) प्रश्न क्रमांक 1. (अ), 1. (ब) व 6 या प्रश्नांची उत्तरे एकापेक्षा अधिक वेळा लिहिलेली असल्यास, प्रथम लिहिलेली उत्तरेच गुणांसाठी गृहीत धरली जातील.

**प्र.1. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पुढील विधाने पूर्ण करा :** **[3]**

1. 'आधुनिक इतिहासलेखनाचा जनक' _______ यास म्हणता येईल.
   (अ) व्हॉल्टेअर (ब) रेने देकार्त (क) लिओपॉल्ड रांके (ड) कार्ल मार्क्स

2. भारताचे राष्ट्रीय अभिलेखागार _______ येथे आहे.
   (अ) मुंबई (ब) चेन्नई (क) दिल्ली (ड) कोलकाता

3. थॉमस कुकने _______ विकण्याचा एजन्सी व्यवसाय सुरू केला.
   (अ) हस्तकौशल्याच्या वस्तू (ब) खेळणी
   (क) खाद्यवस्तू (ड) पर्यटन तिकिटे

**प्र.1. (ब) पुढील प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखून लिहा :** **[3]**

1.

| | | |
|---|---|---|
| i. | हू वेअर द शूद्राज | वंचितांचा इतिहास |
| ii. | स्त्री-पुरुष तुलना | स्त्रीवादी लेखन |
| iii. | द इंडियन वॉर ऑफ इन्डिपेन्डन्स - 1857 | मार्क्सवादी इतिहास |
| iv. | ग्रँट डफ | वसाहतवादी इतिहास |

2.

| | | |
|---|---|---|
| i. | दर्पण | बाळशास्त्री जांभेकर |
| ii. | प्रभाकर | आचार्य प्र. के. अत्रे |
| iii. | दीनबंधू | कृष्णराव जांभेकर |
| iv. | केसरी | बाळ गंगाधर टिळक |


3.

| | | |
|---|---|---|
| i. | ऐतिहासिक पर्यटन | ऐतिहासिक वारसा स्मारक स्थळांना भेटी |
| ii. | नैमित्तिक पर्यटन | फिल्म फेस्टिव्हल, पुस्तक प्रदर्शनाला भेटी |
| iii. | आंतरराष्ट्रीय पर्यटन | थंड हवेच्या ठिकाणांना भेटी |
| iv. | क्रीडा पर्यटन | क्रीडासामने पाहण्यास जाणे |

Target Publications

**प्र.2. (अ) पुढील संकल्पनाचित्रे पूर्ण करा : (कोणतीही दोन)** **[4]**


1.




2.




3.




**प्र.2. (ब) थोडक्यात टिपा लिहा : (कोणत्याही दोन)** **[4]**

1. ॲनल्स प्रणाली
2. खेळ व चित्रपट
3. दशावतारी नाटके

**प्र.3. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा : (कोणतीही दोन)** **[4]**

1. मायकेल फुको यांच्या लेखनपद्धतीला 'ज्ञानाचे पुरातत्त्व' म्हटले जाते.
2. इतिहासाची संशोधनपद्धती अनेक विषयांच्या संशोधनात उपयुक्त ठरते.
3. चित्रकथीसारख्या नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या परंपरेचे पुनरुज्जीवन करणे गरजेचे आहे.
4. विविध विषयांमधील कृतींसाठी प्रशिक्षणाची आवश्यकता असते.

Target Publications

**प्र.4. दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून, त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा :** **[4]**

**तमाशा :** 'तमाशा' हा शब्द मुळात पर्शियन भाषेतील आहे. चित्ताला प्रसन्नता देणारे दृश्य, असा याचा अर्थ आहे. विविध लोककला आणि अभिजात कलांचे प्रवाह सामावून घेत अठराव्या शतकापर्यंत तमाशा विकसित झाला. पारंपरिक तमाशाचे दोन प्रकार आहेत – संगीत बारी आणि ढोलकीचा फड. संगीत बारीमध्ये नाट्यापेक्षा नृत्य आणि संगीतावर अधिक भर असतो. प्राधान्याने नृत्य-संगीताचा समावेश असलेल्या तमाशात कालांतराने 'वग' या नाट्यरूपाचा समावेश केला गेला. उत्स्फूर्त विनोदाच्या आधाराने वग रंगत जातो. तमाशाच्या सुरुवातीला 'गण' म्हणजे गणेशवंदना गायली जाते. त्यानंतर 'गवळण' सादर केली जाते. तमाशाच्या दुसऱ्या भागात मुख्य नाटक म्हणजे 'वग' सादर केला जातो. 'विच्छा माझी पुरी करा' आणि 'गाढवाचे लग्न' यांसारखे मराठी रंगभूमीवर गाजलेले प्रयोग हे तमाशाचे आधुनिक स्वरूप दर्शवतात.

**प्रश्न:**

1. 'तमाशा' हा शब्द कोणत्या भाषेतील आहे ? (1)
2. पारंपरिक तमाशाचे दोन प्रकार कोणते? (1)
3. तमाशाच्या सादरीकरणाचे आधुनिक स्वरूप स्पष्ट करा. (2)

**प्र.5. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा : (कोणतेही दोन)** **[6]**

1. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांचे इतिहासलेखनातील योगदान स्पष्ट करा.
2. अभिलेखागाराच्या व्यवस्थापनात कोणती कामे महत्त्वाची आहेत?
3. कलाक्षेत्रात व्यवसायाच्या कोणत्या संधी उपलब्ध आहेत? स्पष्ट करा.
4. नियतकालिकाची व्याख्या, प्रकार व स्वरूप यांविषयी सविस्तर माहिती लिहा.

**प्र.6. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पुढील विधाने पुन्हा लिहा :** **[2]**

1. भारतीय संविधानात बदल करण्याचा अधिकार ________ आहे.
   (अ) संसदेला (ब) स्थानिक शासन संस्थांना
   (क) विधिमंडळाला (ड) सहकारी संस्थेला

2. शेतीचे उत्पादन वाढवण्यासाठी आणि अन्नधान्याबाबत स्वयंपूर्ण होण्यासाठी ________ करण्यात आली.
   (अ) जलक्रांती (ब) हरितक्रांती
   (क) औद्योगिकक्रांती (ड) धवलक्रांती

**प्र.7. पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा : (कोणतीही दोन)** **[4]**

1. संविधानाचे स्वरूप एखाद्या जिवंत दस्तऐवजाप्रमाणे असते.
2. 'शिरोमणी अकाली दल' हा राष्ट्रीय पक्ष आहे.
3. लोकशाही टिकवण्यासाठी दक्ष राहावे लागते.

**प्र.8. (अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा : (कोणतीही एक)** **[2]**


1. मताधिकार
2. निवडणूक आयोग

Target Publications


**प्र.8. (ब) दिलेल्या सूचनांप्रमाणे कृती करा : (कोणतीही एक)** **[2]**

**पुढील संकल्पनाचित्रे पूर्ण करा :**

1.




2.




**प्र.9. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा : (कोणतेही एक)** **[2]**

1. 'निवडणूक आचारसंहिता' म्हणजे काय, हे स्पष्ट करा.
2. आजच्या कामगार चळवळीसमोर कोणत्या समस्या आहेत?

Target Publications

# बोर्ड प्रश्नपत्रिका: मार्च २०१९

## इतिहास व राज्यशास्त्र

**वेळ: 2 ½ तास** **एकूण गुण: 60**

**सूचना:**

1. सर्व कृती/प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.
2. उजवीकडील अंक प्रश्नांचे/कृतीचे पूर्ण गुण दर्शवतात.
3. प्रश्न क्रमांक 1 ते 5 प्रश्न/कृती इतिहास व प्रश्न क्रमांक 6 ते 9 प्रश्न राज्यशास्त्र या विषयावरील आहेत.
4. प्रश्न क्रमांक 1(अ) मध्ये संपूर्ण विधान लिहिणे आवश्यक आहे.
5. प्रश्न क्रमांक 2(अ) आणि 8(ब) मधील दिलेली संकल्पनाचित्रे त्याच नमुना आराखड्यानुसार पेनाने उत्तरपत्रिकेत तयार करणे अपेक्षित आहे.
6. प्रश्न क्रमांक 1(ब) मधील प्रत्येक संचातील पहिला घटक तसाच ठेवून दुसऱ्या घटकाची दुरुस्ती करणे अपेक्षित आहे.

**1. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधान पुन्हा लिहा:** **[4]**

1. ‘प्रिमिटिव्ह कम्युनिझम टु स्लेव्हरी’ हे पुस्तक ………. इतिहासलेखनाचे उदाहरण आहे.
   अ) वसाहतवादी ब) प्राच्यवादी
   क) राष्ट्रवादी ड) मार्क्सवादी

2. भारताचे राष्ट्रीय अभिलेखागार ………. येथे आहे.
   अ) दिल्ली ब) कोलकाता
   क) मुंबई ड) चेन्नई

3. भारतातील पहिले इंग्रजी वर्तमानपत्र ………. यांनी सुरू केले.
   अ) जेम्स ऑगस्टस हिकी ब) सर जॉन मार्शल
   क) ॲलन ह्यूम ड) बाळशास्त्री जांभेकर

4. ऑलिंपिक स्पर्धांची परंपरा ………. येथे सुरू झाली.
   अ) ग्रीस ब) रोम
   क) भारत ड) चीन

**(ब) पुढीलपैकी चुकीची जोडी दुरुस्त करून पुन्हा लिहा:** **[4]**

1.
   1. जॉर्ज विल्हेम फ्रेडरिक हेगल – रिझन इन हिस्टरी
   2. लिओपॉल्ड व्हॉन रांके – द थिअरी ॲण्ड प्रॅक्टिस ऑफ हिस्टरी
   3. हिरोडोटस – द हिस्टरीज
   4. कार्ल मार्क्स – डीसकोर्स ऑन द मेथड


2.
   1. कुतुबमिनार – मेहरौली
   2. गोलघुमट – विजापूर
   3. छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे टर्मिनस – दिल्ली
   4. ताजमहाल – आग्रा

3.
   1. कीचकवध – कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर
   2. एकच प्याला – राम गणेश गडकरी
   3. इथे ओशाळला मृत्यू – वसंत कानेटकर
   4. नटसम्राट – विजय तेंडुलकर


4. 1. घारापुरी (एलिफंटा) – लेणी
   2. पंढरपूर – देवस्थान
   3. सागरेश्वर – धरण
   4. पाचगणी – थंड हवेचे ठिकाण

**2. (अ) दिलेली संकल्पनाचित्रे पूर्ण करा (कोणतेही दोन): [4]**


1.




2. पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा:




3. पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा:




**(ब) थोडक्यात टिपा लिहा (कोणत्याही दोन): [4]**

1. भारतीय संस्कृती कोश
2. प्रसारमाध्यमांची आवश्यकता
3. खेळणी आणि उत्सव

**3. (अ) पुढील विधाने सकारण स्पष्ट करा (कोणतेही दोन): [6]**

1. सर्व प्रसारमाध्यमात दूरदर्शन अतिशय लोकप्रिय माध्यम आहे.
2. प्रादेशिक इतिहासलेखनाला चालना मिळाली.
3. जागतिक वारशाच्या पदास पात्र ठरणारी स्थळे, परंपरा यांची यादी युनेस्कोद्वारे जाहीर केली जाते.
4. आजच्या काळात परदेशात जाण्याचे प्रमाण वाढत आहे.
5. महाराष्ट्रातील संत एकनाथांची भारुडे लोकप्रिय झाली.

**(ब) थोडक्यात उत्तरे लिहा (कोणतेही दोन):** **[6]**

1. व्हॉल्टेअर यांना आधुनिक इतिहासलेखनाचे जनक असे का म्हणतात?
2. लोक शिल्पकला याविषयी माहिती लिहा.
3. बाळ ज. पंडित यांच्या क्रिकेट समालोचनाची कोणती वैशिष्ट्ये तुम्हांला सांगता येतील?

**4. दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा :** **[4]**

**'भारत एक खोज'**

भारताच्या प्राचीन ते अर्वाचीन इतिहासाच्या संदर्भात दूरदर्शनवरून प्रसारित झालेली 'भारत एक खोज' ही मालिका महत्त्वाची आहे. पंडित नेहरू यांच्या 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' या ग्रंथावर आधारित ही मालिका होती. श्याम बेनेगल दिग्दर्शित या मालिकेने प्राचीन काळ ते अर्वाचीन काळाचा सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय इतिहास मांडला. सखोल संशोधन आणि सादरीकरण या पातळीवर ही मालिका सरस ठरली.

हडप्पा संस्कृती, वैदिक काळ, रामायण-महाभारताचा अन्वयार्थ, मौर्य कालखंड, तुर्क-अफगाण आणि मोगलांचे आक्रमण, मुघल कालखंड आणि मुघल बादशहांचे योगदान, भक्तिचळवळ, छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य, समाजसुधारणा चळवळी आणि स्वातंत्र्यसंग्राम अशा अनेक घटना या मालिकेतून मांडल्या गेल्या.

या मालिकेत नाट्य, लोककला, प्रबोधनपर माहिती असा आधार घेत नेहरूंच्या रूपातील कलावंत रोशन सेठ प्रास्ताविक व अन्वयार्थ सांगत असत. नेहरूंचा इतिहासाकडे बघण्याचा दृष्टिकोन आणि त्याचे प्रभावी सादरीकरण यामुळे ही मालिका संपूर्ण भारतभर वाखाणली गेली.

1. 'भारत एक खोज' ही मालिका कोणत्या ग्रंथावर आधारित आहे?
2. 'भारत एक खोज' या मालिकेचे दिग्दर्शन कोणी केले?
3. 'भारत एक खोज' मालिका लोकप्रिय ठरण्यास कोणते घटक कारणीभूत असावेत असे तुम्हांस वाटते?

**5. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही दोन):** **[8]**

1. नैसर्गिक आणि सांस्कृतिक वारसा जतन करण्याच्या प्रकल्पातून कोणत्या गोष्टी साध्य होतात?
2. ग्रंथालय व्यवस्थापन का महत्त्वाचे आहे?
3. पर्यटन हा सर्वाधिक रोजगार निर्माण करणारा व्यवसाय होऊ शकतो याविषयी तुमचे मत व्यक्त करा.
4. कार्ल मार्क्स यांचा वर्गसिद्धांत स्पष्ट करा.

**6. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय लिहा:** **[4]**

1. लोकशाहीचा गाभा म्हणजे _______.
   (अ) प्रौढ मताधिकार (ब) सत्तेचे विकेंद्रीकरण
   (क) राखीव जागांचे धोरण (ड) न्यायालयीन निर्णय

2. शेतकरी चळवळीची ______ ही प्रमुख मागणी आहे.
   (अ) वनजमिनीवर लागवड करण्याचा अधिकार मिळावा
   (ब) शेतमालाला योग्य भाव मिळावा
   (क) ग्राहकांचे संरक्षण करणे
   (ड) धरणे बांधावित

3. 'जस्टीस पार्टी' या ब्राह्मणेतर चळवळीचे रूपांतर _______ या राजकीय पक्षात झाले.
   (अ) आसाम गण परिषद (ब) शिवसेना
   (क) द्रविड मुन्नेत्र कळघम (ड) जम्मू आणि काश्मीर नॅशनल कॉन्फरन्स

4. जगातील सर्वच लोकशाही राष्ट्रांपुढील मोठे आव्हान म्हणजे _______.
   (अ) धार्मिक संघर्ष (ब) नक्षलवादी कारवाया
   (क) लोकशाहीची पाळेमुळे आणखी खोलवर नेणे (ड) गुंडगिरीला महत्त्व

**7. पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा (कोणतेही दोन): [4]**


1. संविधानाचे स्वरूप एखाद्या जिवंत दस्तऐवजाप्रमाणे असते.
2. एखाद्या घटक राज्यात केव्हा व किती टप्प्यात निवडणुका घ्यायच्या हे राज्य सरकार ठरवते.
3. निवडणुकीतील भ्रष्टाचारामुळे लोकांचा लोकशाही प्रक्रियेवरचा विश्वास उडू शकतो.

**8. (अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा (कोणतेही दोन) : [4]**


1. प्रादेशिकता
2. जलक्रांती
3. माहितीचा अधिकार

**(ब) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा (कोणतेही दोन) : [4]**


1. निवडणूक प्रक्रिया :




2. भारतातील राष्ट्रीय पक्षांच्या स्थापनेसंदर्भातील पुढील कालरेषा पूर्ण करा:




3. पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा :



**9. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा (कोणतेही दोन):** **[4]**

1. स्वातंत्र्यपूर्वकाळात स्त्री चळवळी कोणत्या सुधारणांसाठी लढत होत्या?
2. राजकीय प्रक्रिया पारदर्शक होण्यासाठी कोणते प्रयत्न केले जातात?
3. पहिल्या लोकसभा निवडणुकीच्या मतदान पद्धतीचे कोणते वैशिष्ट्य तुम्हांला जाणवते?
4. कोणत्या कायद्यांमुळे महिलांना आपले स्वातंत्र्य जपण्यास आणि स्वत:चा विकास साधण्यास अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे?